# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Home Economics

## Assignment

### Session: 2021-2022

### Subject: Home Economics

www.youvaworld.com

Date : Page :

Topic :

नाव :- मोनिका विनायकराव निंबाळकर

वर्ग :- B.A. V sem

विषय :- गृहअर्थशास्त्र

कॉलेज :- यशोदा गर्ल्स आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज

मार्गदर्शिका :- डॉ. रेखा झोरिंग

2021 - 2022

30-11-2021

SEAL

PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Snehnagar, Nagpur-15

पहला महीना जारी...



दूसरा महीना



Good

www.youvaworld.com

Date : Page :

Topic :

## जन्मोत्तर समायोजनावर परिणाम करणारे घटक

जन्मोत्तर परिस्थितीत म्हणजेच नवजातावस्थेवर परिणाम करणारे घटक अभ्यासणे आवश्यक आहे. ते घटक पुढीलप्रमाणे आहेत.

### जन्मपूर्व परिस्थिती

सर्वात महत्वाचा घटक म्हणजे जन्मपूर्व परिस्थिती कशी होती, म्हणजेच बाळ आईच्या गर्भाशयात वाढत असतांना कोणती परिस्थिती होती. प्रतिकूल की अनुकूल. जर जन्मपूर्व परिस्थिती प्रतिकूल असेल तर त्याचे वाईट परिणाम नवजाताच्या समायोजनावर होतात. हे घटक म्हणजे मातेचे कुपोषण, अनारोग्य, भावनिक ताणतणाव, आजार इत्यादी. या कारणांनी प्रसुती दरम्यान देखील अडचणी व धोके उद्भवतात व जन्मानंतर अर्भकास समायोजन करणे कठीण जाते.

जर जन्मपूर्व परिस्थिती / घटक अनुकूल असतील तर त्याचे चांगले परिणाम पहायला मिळतात. असे अर्भक जन्मानंतर बाह्य परिस्थितीशी सहजपणे समायोजन करु शकतात.

### जन्माशी संबंधित अनुभव

प्रसुती पूर्व वेदनांच्या काळात स्त्रियांना जास्त औषधे दिली गेल्यास, प्रसुतीनंतर

SEAL

तीसरा महीना



www.youvaworld.com
Date : Page :
Topic :

अर्भक जास्त काळ सुस्तावलेली दिसतात. कारण स्त्रियांना जास्त त्यांच्यावर या औषधांचा परिणाम झालेला असतो. तसेच अर्भकाच्या वजनावर घर जास्त प्रमाणात होते म्हणून वेदना-शामक औषधे किती प्रमाणात दिली गेली याचा अर्भकाच्या समायोजनावर परिणाम होतो.

## जन्माचा प्रकार :-

अर्भकाचा जन्म कशाप्रकारे झाला हेही महत्वाचे ठरते. अर्भकाचा जन्म नैसर्गिकपणे, सुलभपणे होतो की नाही यावर पुढील काळा-तील समायोजन अवलंबून असते. जर जन्माच्या प्रक्रियेत / प्रसूती प्रक्रियेत अडथळे आले असतील तर अर्भकाच्या समायोजनावर त्याचा परिणाम होतो. जसे. गर्भाची स्थिती अयोग्य झाल्यास नैसर्गिक प्रसूती (Normal Delivery) होणे शक्य नसते. त्यावेळी बाह्य साधनांच्या साहाय्याने किंवा शस्त्रक्रियेद्वारे जन्म घडून येतो. यावेळी अर्भकाला होणारा त्रास पुढील काळातील समायोजनावर परिणामकारक ठरतो.

## अपरिपक्व जन्म :-

गर्भावस्थेचा कालखंड किंवा जन्मपूर्व अवस्थेचा कालावधी साधारणपणे २८० दिवसांचा असतो. परंतु कधीकधी काही कारणांनी पूर्ण दिवस होण्याच्या आतच शिशूचा जन्म होतो, त्याला अपरिपक्व शिशू म्हणतात. अपरिपक्व असल्यामुळे

शिशूचे वजन कमी असते. ते अशक्य असते त्यामुळे ते बाहेरील तापमान, पोषण, उत्सर्जन इत्यादी गोष्टींशी समायोजन करण्यास असमर्थ ठरते व सामान्य बालकाच्या तुलनेत विकास प्रक्रियेत थोडे मागे पडते.

जन्मानंतरची काळजी :-

बालकांच्या जन्माबद्दल माता. पित्यांच्या दृष्टिकोन कसा आहे, ते त्याबद्दल किती उत्साही आनंदी आहे. त्याच्या संगोपणा. बद्दल किती जागरुक आहेत यावर बालकाचे जन्मोत्तर समायोजन सुलभ होते. किंवा क्षीण होते. मातापित्यातील ताणतणाव, कौटुंबिक कलह, आर्थिक असमर्थता इत्यादी घटक बालकाच्या समायोजनात अडथळे आणू शकतात.

बालकांची मानसिकता :-

जन्मानंतर अर्भकाच्या गरजा कशा पद्धतीने पूर्ण होतात. त्याची संगोपनाची पद्धत कोणती इत्यादी घटक महत्वपूर्ण ठरतात. त्याला वेगवेगळ्या वातावरणात समायोजित होईल अशी परिस्थिती आहे का? जसे - थंडीच्या दिवसात त्याला उबदार कपडे व उबदार वाटेल अशी व्यवस्था आहे का? त्याचे संगोपन माता करते की परिचारिका याचा देखील शिशूच्या समायोजनावर परिणाम होतो.

www.youvaworld.com
Date : Page :
Topic :

थोडक्यात असे म्हणता येते की, जन्मोत्तर समायोजन जेवढे चांगले होईल तेवढा त्याच्या वाढीला व विकासाला हातभार लागेल. अर्भकाला योग्य व अनुकूल परिस्थिती प्रदान करण्याची मुख्य जबाबदारी मातापित्याची असते, त्यासाठी त्यांनी जागरूक असले पाहिजे.

SEAL
PRINCIPAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur-15